# आम्ही पार्लेकर

१९९१ पासून

प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष २८ वे | अंक आठवा | पृष्ठे १४ | मूल्य: ₹ ५ | ऑगस्ट २०२० | www.parlekar.com



या अंकात


पान ०२ दहावीचा निकाल

पान ०३ ऑनलाईन शिक्षण काळाची गरज आणि बरंच काही

पान ०८ लाईन शिवाय 'ऑनलाईन' खरेदीचा सुरक्षित मार्ग – निमिष वा. पाटगांवकर

पान ०७ बायोस्कोप – चित्रा वाघ

लक्षवेधी...
डॉ. शेखर आंबर्डेकर

...पान ५

## दहावीचा रिझल्ट

# पार्लेकर विद्यार्थ्यांचे उज्ज्वल यश

सर्वसाधारणपणे जून, जुलै महिने म्हणजे प्रामुख्याने शाळा उघडण्याचे, नवीन दप्तरे, वह्या, पुस्तके घेऊन शाळेत जाणाऱ्या उत्साही विद्यार्थ्यांचे आणि दहावीच्या यशस्वी विद्यार्थ्यांच्या कौतुक समारंभांचे असतात. परंतु कोव्हीड महामारीच्या ओढवलेल्या संकटामुळे जगण्याचे सर्वमान्य निकषच बदलून गेले आहेत. काही बदल शिक्षणपद्धतीत देखील करावे लागले आहेत. सध्या शाळांचे वर्ग ऑनलाईन पद्धतीने सुरु असून विद्यार्थ्यांविना

| शाळेचे नाव | बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | एकूण निकाल |
|---|---|---|---|
| पार्ले टिळक विद्यालय (मराठी माध्यम) | ३४७ | ३४७ | १००% |
| पार्ले टिळक विद्यालय (इंग्रजी माध्यम) | २१७ | २१७ | १००% |
| पार्ले टिळक विद्यालय – (आयसीएसई) | ०८२ | ०८२ | १००% |
| परांजपे विद्यालय | १२६ | १२६ | १००% |
| ग्रेटर मुंबई एज्युकेशन सोसायटी | १४७ | १४७ | १००% |
| प्रार्थना समाज हायस्कूल | ०१३ | ०९ | ७०% |
| ओरायन स्कूल – (आयसीएसई) | ०६८ | ०६८ | १००% |
| श्री. माधवराव भागवत हायस्कूल (इंग्रजी माध्यम) | १६७ | १६७ | १००% |
| श्री. माधवराव भागवत हायस्कूल (मराठी माध्यम) | ११२ | १०९ | ९७.३२% |

(अधिक माहिती व छायाचित्रे पान क्र.२ वर)

शाळा अक्षरशः ओसाड पडल्या आहेत. लॉकडाऊनच्या आधीपासूनच बोर्डाच्या परीक्षा सुरु झाल्या होत्या आणि काही विषयांचे पेपर झालेही होते. परंतु अचानक लॉकडाऊन सुरु झाला आणि राहिलेल्या परीक्षा रद्द कराव्या लागल्या. सुदैवाने कमी विषयांचे पेपर राहिल्यामुळे एकूण गुणांच्या निकषाकरिता झालेल्या परीक्षेच्या सरासरीचा मार्ग अवलंबून निकाल जाहीर करण्यात आले.

यंदा एसएससी बोर्डाचा निकाल ९५.३० टक्के लागला असून मागील वर्षी हे प्रमाण ७७.१० टक्के एव्हढे होते. याबाबत शिक्षणतज्ज्ञांसह अनेकजण आश्चर्य व्यक्त करीत आहेत. आयसीएसई बोर्डाचा रिझल्ट ९९.३३ टक्के लागला आहे आणि तब्बल २४२ विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुण मिळवले आहेत. पार्ले टिळक शाळेच्या दृष्टीने अभिमानास्पद बाब म्हणजे शाळेच्या १०० व्या वर्षाच्या पदार्पणात संस्थेच्या चारही शाळांचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. ■




४, रेलकॉन हाऊस, एम. जी. रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७
दू : २६१५३०५५ / २६१४९५३५ मो : + ९१ ९९२०१ १४२४०

CLICK TO PLACE
YOUR AD HERE!

॥ श्री व्याडेश्वर प्रसन्न ॥

साठे यांचे

卐 विजय स्टोअर्स 卐

सहजीवन, ४ श्रद्धानंद रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई – ४०० ०५७. फोन : २६१४६६४१, २६१८८५२९

नमस्कार

सर्व प्रथम सगळ्यांना हिंदु नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा...

सध्या कोरोना व्हायरसने जगभरात धुमाकूळ घातला आहे. आपल्या मुंबईतही काही रुग्ण सापडले आहेत.

सुरवातीचा काही काळ हा सर्वांसाठी संभ्रमाचा होता तो तसा आमच्यासाठीही होता. म्हणून त्या काळात सर्वांच्या काळजी पोटी आम्ही **विजय स्टोअर** बंद ठेवलं होतं. पण आता....

मा. पंतप्रधान व मा. मुख्यमंत्र्यांनी या प्रसंगी ह्या काळात कोणत्या जीवनावश्यक गोष्टी चालू रहातील ह्याची स्वच्छता दिली आहे...

म्हणून आम्ही **विजय स्टोअर दिनांक २६/०३/२०२० पासून रोज सकाळी ९ ते ११** चालू करत आहोत.

मा. पंतप्रधान व मा. मुख्यमंत्र्यांनी आपल्याला या कठीण प्रसंगी **सोशल डिस्टनसिंग** द्वारे कशी काळजी घ्यावी हे सांगितले आहे..... ती सर्व काळजी आम्ही आपल्या काळजीपोटी घेणार आहोत..... याला आपण सहकार्य कराल याची खात्री आहे.

**१) गर्दी करू नका**

**२) सामानाची यादी तयार करूनच घेऊन या.... म्हणजे वेळ जाणार नाही**

**३) कृपया सुट्टे पैसे घेऊन या**

**४) नियमांचे काटेकोर पालन करा सोशल डिस्टनसिंग ठेवा**

**स्वतः ची काळजी घ्या आणि इतरांनाही सहकार्य करा.**

**आमची शाखा कुठेही नाही**

लहान मुले/मुली आणि बाळांसाठी : बारसे, उष्टावण, जावळ, वाढदिवस, मुंज

इतर पूजा आणि शांती : सत्यनारायण, उदकशांती, वास्तुशांती, सहस्त्रावर्तन, लघुरुद्र

वास्तु विशेष



वास्तुशांती

नविन घर किंवा Office घेतल्यावर केला जाणारा प्रथम व अतिशय शुभ विधी म्हणजे वास्तुशांती! घरात किंवा Office मध्ये काही मोठा रचनाबदल केल्यानंतरही वास्तुशांती केली जाते. तसेच दर १२ वर्षांनी वास्तुशांती पुन्हा करता येते. वास्तुशांतीमुळे वास्तुशुद्धी होऊन घर अतिशय सुखी व समाधानी होते असे तज्ञांचे मत आहे.

गृहप्रवेश

काही अपरिहार्य कारणामुळे जर वास्तुशांती विधी करून घेणे शक्य नसल्यास गृहप्रवेश विधी केला जातो. गृहप्रवेश विधी करून नंतर नविन घरात रहायला सुरुवात केली जाते आणि नंतर योग्य मुहूर्तावर वास्तुशांती केली जाते.





उदकशांती

वास्तुशुद्धीसाठी अतिशय महत्त्वाचा मानला गेलेला विधी म्हणजेच उदकशांती. उदकशांती ही ब्रह्मदेवाची उपासना आहे. घरातील कुटुंबाचे आरोग्य, शिक्षण तसेच व्यवसायात उत्तम यश प्राप्त करून घेण्यासाठी घरात व व्यवसायातील उत्तम प्रगतीसाठी Offices मध्ये उदकशांती करून घ्यावी असे तज्ञांचे मत आहे. तसेच घरातील प्रिय व्यक्तीच्या दुःखद निधनानंतर आणि नारायणबली/नागबली, त्रिपींडी श्राद्ध असे विधी केल्यानंतरही उदकशांती केली जाते.

OPANDIT
SHUBHAM BHAVATU

Mumbai & Suburbs + Thane
+91-9167968204
mrudula.barve@oPandit.com
www.oPandit.com

Think of a Dharmic Vidhi, Think of oPandit !
संपूर्ण सामग्रीसहित

वधू आणि वर यांसाठी : लग्न, साखरपुडा

ज्येष्ठ नागरिकांसाठी : साठीशांत, पंच्याहत्तरी, ऐंशी वर्षांनी शांत

श्राद्ध विधी : हिरण्य श्राद्ध, सपिंडक श्राद्ध, अंत्येष्टि विधी

# पार्ले पूर्व परिसरातील शाळांमधून दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे 'आम्ही पार्लेकर' तर्फे हार्दिक अभिनंदन

### ग्रेटर मुंबई एज्युकेशन सोसायटी हायस्कुल

| क्र. | विद्यार्थ्याचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | गौरव अलगावकर | ९२.००% |
| २ | आदित्य यादव | ९१.८०% |
| ३ | आकाश केणी | ८८.८०% |
| ४ | यश पार्सेकर | ८८.२०% |
| ४ | देवांग थाले | ८८.००% |

### पार्ले टिळक विद्यालय (आयसीएसई)

| क्र. | विद्यार्थ्याचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | शर्मद भोयर | ९८.८०% |
| २ | अथर्व शहाणे | ९८.६०% |
| २ | आदिती पिलई | ९८.६०% |
| २ | सानिध्या रानडे | ९८.६०% |
| ३ | रिया त्रिवेदी | ९८.४०% |
| ४ | प्रांजली पिळणकर | ९८.२०% |
| ४ | आभा फडके | ९८.२०% |
| ४ | विराज तुंगारे | ९८.२०% |
| ५ | मैत्रेय चितळे | ९८.००% |
| ५ | अन्वय सवाई | ९८.००% |
| ५ | अथर्व मेहेंदळे | ९८.००% |

### पार्ले टिळक विद्यालय ( मराठी माध्यम)

| क्र. | विद्यार्थ्याचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | समृद्धी फडके | ९६.८०% |
| २ | आसावरी विध्वांस | ९६.००% |
| ३ | आदिती डिके | ९४.८०% |
| ३ | धनश्री गुरम | ९४.८०% |
| ४ | गार्गी करंबेळकर | ९३.८०% |

### श्री.माधवराव भागवत हायस्कुल(मराठी माध्यम)

| क्र. | विद्यार्थ्याचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | सिद्धांत कद्रू | ९४.८०% |
| २ | सेहल कुसुमवार | ९२.८०% |
| ३ | मनाली गुगले | ९०.२०% |
| ३ | नम्रता वरठे | ९०.२०% |
| ४ | प्रांजल नवले | ८९.४०% |
| ५ | आयुष घाग | ८७.६०% |

### प्रार्थना समाज हायस्कुल

| क्र. | विद्यार्थ्याचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अल्ताफ शेख | ८१.८०% |
| २ | कल्पेश निकम | ६९.८०% |
| ३ | उत्तम शीर | ६८.८०% |
| ४ | मयूर माळी | ६४.००% |
| ५ | क्षितीजा बारसिंग | ६१.४०% |

## हार्दिक अभिनंदन

### ओरायन स्कुल (आयसीएसई)

| क्र. | विद्यार्थ्याचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | आदित्य पाधी | ९८.०४% |
| २ | मनन खेर | ९८.०२% |
| २ | स्पुर्ती शेट्टी | ९८.०२% |
| ३ | वत्सल शाह | ९८.००% |
| ३ | जान्हवी पडलीकर | ९८.००% |
| ४ | आयुष सिनकर | ९७.०८% |
| ५ | शुभम निरगुडकर | ९७.०६% |
| ५ | मेधज हडकर | ९७.०६% |

### पार्ले टिळक विद्यालय (इंग्रजी माध्यम)

| क्र. | विद्यार्थ्याचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अथर्व जोशी | ९८.२०% |
| २ | वेदिका कोळंबकर | ९७.८०% |
| ३ | श्रावणी निकम | ९६.८०% |
| ३ | निधी छेडा | ९६.८०% |
| ३ | आदित्य शिंदे | ९६.८०% |
| ४ | सौम्यश्री मुनी | ९६.६०% |
| ५ | सौमित्र गुरव | ९६.००% |

### श्री.माधवराव भागवत हायस्कुल (इंग्रजी माध्यम)


| क्र. | विद्यार्थ्याचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | ओम सकपाळ | ९८.६०% |
| २ | पूर्वा सावंत | ९६.८०% |
| ३ | प्रमाथ केळकर | ९६.६०% |
| ४ | जतीन वर्मा | ९६.४०% |
| ५ | अर्जुन धामणस्कर | ९६.२०% |

### परांजपे विद्यालय

| क्र. | विद्यार्थ्याचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | कार्तिक शेळके | ९१.४०% |
| २ | राधा दळवी | ९१.००% |
| ३ | हर्ष वाडकर | ८९.२०% |
| ४ | सायली होजगे | ८८.८०% |
| ४ | राजाराम कानसे | ८८.८०% |
| ५ | पूर्वा घाडीगावकर | ८७.२०% |



पार्ले टिळक विद्यालय (इंग्रजी माध्यम) शाळेचे गुणवंत विद्यार्थी



ग्रेटर मुंबई एज्युकेशन सोसायटी हायस्कुल शाळेचे गुणवंत विद्यार्थी



पार्ले टिळक विद्यालय (आयसीएसई) शाळेचे गुणवंत विद्यार्थी



प्रार्थना समाज हायस्कूल शाळेचे गुणवंत विद्यार्थी



ओरायन स्कुल (आयसीएसई) शाळेचे गुणवंत विद्यार्थी



परांजपे विद्यालय शाळेचे गुणवंत विद्यार्थी



श्री.माधवराव भागवत हायस्कूल(इंग्रजी माध्यम) शाळेचे गुणवंत विद्यार्थी



श्री.माधवराव भागवत हायस्कूल(मराठी माध्यम) शाळेचे गुणवंत विद्यार्थी



पार्ले टिळक विद्यालय ( मराठी माध्यम) शाळेचे गुणवंत विद्यार्थी

# ऑनलाईन शिक्षण

## काळाची गरज आणि बरंच काही

२०२० हे वर्ष २० – २० क्रिकेट सारखं चाललंय. करोनामुळे प्रत्येक क्षेत्रावर ह्याचा परिणाम झाला मग शिक्षण क्षेत्र कसं ह्यापासून दूर राहील? इतर क्षेत्रांप्रमाणेच कोरोनानंतर का हा विचार शिक्षणक्षेत्रातही सुरू झाला. एप्रिल आणि मे महिन्यात खूपशा शाळा आणि मुख्यत्वे करून महाविद्यालये ह्यांच्यात वेबिनार आयोजित करण्याची एक जोरदार स्पर्धा लागली. 'उदंड जाहले वेबिनार' अशी अवस्था तेव्हा प्राध्यापक–शिक्षकांची झाली होती. पण जेव्हा ऑनलाईन शिक्षणाचा विचार पुढे आला तेव्हा सगळ्याच शाळा आणि महाविद्यालये त्याबाबतीत साकल्याने विचार करू लागली. आता खुपशा शाळा–महाविद्यायांमध्ये ऑनलाईन वर्ग सुरुसुद्धा झाले आहेत.

मी स्वतः प्राध्यापक असल्याने आणि ही सगळी प्रक्रिया फार जवळून बघितल्याने जेव्हा शिक्षणक्षेत्रातील ह्या मोठ्या बदलाबाबत मी विचार करतो तेव्हा एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे सोशल मीडियावर एक तर ह्या ऑनलाईन शिक्षण पद्धतीवर कडाडून टीका बघायला–वाचायला मिळते किंवा वारेमाप स्तुती. ह्या दोन्ही गोष्टी चुकीच्या आहेत. आज जी काही ऑनलाईन शिक्षणासाठी पोर्टल्स उपलब्ध आहेत त्यांची वर्गवारी दोन प्रकारे करण्यात येईल.

१. प्रत्यक्ष ऑनलाईन शिक्षण देण्यासाठी (ZOOM, Google Meet, Cisco Webex आणि Big Blue Button इ.माध्यमे)

२. शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांसोबत सामायिक करण्यासाठी (आणि परीक्षा घेण्यासाठी Google Classroom, Moodle इ. माध्यमे)

### ऑनलाईन शिक्षणाचे प्रमुख घटक –

ह्या नव्या शिक्षणपद्धतीमधील प्रमुख घटकांचा स्वतंत्रपणे विचार करूया.

- **शिक्षण संस्थांचे व्यवस्थापन मंडळ**

शिक्षण संस्थांच्या समोर प्रमुख प्रश्न होता आपल्या कर्मचारी वर्गाचा पगार कसा करायचा? विद्यार्थ्यांचा पुढच्या वर्षी प्रवेश न झाल्याने फी नाही आणि त्यामुळे अनेक ठिकाणी प्राध्यापक–शिक्षक आणि इतर कर्मचारी ह्यांच्या पगारात कपात तसेच वेळेत पगार न मिळाल्याच्या घटना पाहायला मिळाल्या. आता ह्यात ऑनलाईन शिक्षणाची सोय करायची म्हणजे खर्च आलाच. Zoom चा एक Licensed अकाऊंट घ्यायचा म्हणजे महिन्याला साधारणपणे $ १५ ते $ १९ खर्च आहे.



एका अकाऊंटवरून एका वेळी एकच वर्ग घेऊ शकतो. म्हणजे जिथे एकाच वेळी २० वर्ग एकत्र चालतात त्याचा खर्च विचारात घेतला पाहिजे. जी गोष्ट Zoom ची तीच इतर पोर्टल्सची. जरी ह्या पोर्टल्सची फ्री व्हर्जन्स असली तरी त्यात डेटा चोरीची शक्यता आहे. सध्या Google G-Suit शिक्षण संस्थांसाठी मोफत आहे पण मागणी बघता लवकरच ह्याचेही मूल्य द्यावे लागेल हे निश्चित. काही ठिकाणी स्मार्ट क्लासरूम ही संकल्पना राबवण्यात येत आहे पण तीही खर्चिक आहेच. हे बघता शिक्षण संस्थांच्या खर्चात वाढ होणार आणि हा भार शेवटी विद्यार्थ्यांवर येणार हे निश्चित कारण आत्ता तरी सरकार कुठलीही देणगी ह्यासाठी देत नाहीये. तेव्हा खाजगी देणगीवर अवलंबून राहावं लागणार आहे किंवा विद्यार्थ्यांवर.

- **प्राचार्य – मुख्याधापक –**

मी ह्या लेखाच्या निमित्ताने पार्ल्यातील प्रमुख शिक्षण संस्थांच्या प्राचार्य–मुख्याध्यापकांशी चर्चा केली. त्यांच्याशी केलेल्या चर्चेत खालील गोष्टी अधोरेखित झाल्या:

**PTVA's IM** चे संचालक डॉ. हरीशकुमार पुरोहित ह्यांच्या मते भारतात हायब्रीड शिक्षण पद्धतीची गरज आहे. ज्यात ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही



पद्धतींचा संगम असावा. शिक्षण संस्थांनी ह्यासाठी गुंतवणूक करावी, प्राध्यापकांनी स्वतःला ह्यासाठी तयार करावे आणि विद्यार्थ्यांना फक्त पदवीसाठी नाही तर पुढील नोकरीसाठी सुद्धा तयार करावे. उदाहरणार्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर डोके ह्यांनी हे स्पष्ट केले की वर्गातल्या प्रत्यक्ष शिक्षण पद्धतीला ऑनलाईन हा पूर्णवेळ पर्याय होऊ शकत नाही पण हा सध्याच्या काळातील पर्याय आहे. अनेक समस्या विद्यार्थी आणि प्राध्यापक ह्यांना भेडसावत आहेत पण ह्यातून मार्ग काढून त्यातून शिक्षण सुरु ठेवणे हे महत्वाचे. ऑनलाईन हा पर्यावरणपूरक पर्याय आहे तेव्हा त्याचा वापर करायलाच हवा. पार्ले टिळक इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका साधना सहस्रबुद्धे ह्यांच्याकडून समजले की शाळा आणि शाळेचे वर्ग ह्यामुळे एका ॲपमध्ये सामावले जाणार आहेत ह्या व्हर्चुअल अर्थात आभासी शाळेत तुम्ही कुठूनही सहभागी होऊ शकता. ह्यामुळे पारंपरिक शिक्षण पद्धतीबरोबरच शिक्षक नवे प्रयोग करू शकतात विषय शिकवण्यासाठी PPT, ऑडिओ व्हिजुअल माध्यमांचा वापर करता येऊ शकतो. विद्यार्थ्यांसाठीही हा वेगळा अनुभव असेल.

पार्ले टिळक मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका लतिका ठाकूर ह्यांचं मत थोडं वेगळं आहे आज मराठी माध्यमात येणाऱ्या मुलांसमोर अनेक आर्थिक समस्या आहेत त्यामुळे कनिष्ठ मध्यम वर्गातील मुलांकडे स्मार्टफोनची उपलब्धता, ऑनलाईनसाठी लागणारा डेटा पॅक, अनेक कुटुंबं गावाला गेल्यामुळे तिथली नेटवर्कची समस्या ह्या गोष्टी आहेतच. तरी त्या हेही म्हणतात आत्ताच्या परिस्थितीत ऑनलाइनला सध्या तरी पर्याय नाही.

- **शिक्षक – प्राध्यापक**

शिक्षक–प्राध्यापक ह्यांच्यासाठी ऑनलाईन शिकवणं हे एक नवं आव्हान आहे. अर्थात एक प्राध्यापक म्हणून मला असं नेहमीच वाटतं शिक्षकाने कुठल्याही नव्या तंत्राचा मोकळ्या मनाने स्वीकार करावा तरच शिक्षक स्वतःची शिकवण्याची पद्धत अद्ययावत करू शकतो आणि काळाबरोबर राहून आपला विषय अधिक चांगल्याप्रकारे शिकवू शकतो. मला स्वतःला हा नवा प्रयोग खूप आवडतोय. मी स्वतः माझ्या विषयाच्या PPT बनवतोय, माझ्या विषयावरचे व्हिडिओ शोधतोय, मी छोट्या Quiz घेऊ शकतो आणि बरंच काही. मुख्य म्हणजे शिक्षकाला त्याच्या वर्षानुवर्षं अडकलेल्या कोषातून बाहेर पडून नवीन काही करता येईल अशी ही वेळ आहे. पण यात काही समस्याही आहेत. जे वयाने जेष्ठ अनुभवसंपन्न शिक्षक आहेत, ते आपापल्या विषयातील तज्ज्ञ आहेत मात्र हे नवं तंत्र आत्मसात करण्यात त्यांना खूप अडचणी येत आहेत. अनेक प्राध्यापकांकडे आज लॅपटॉपसुद्धा नाहीये आणि असला तरी ह्या नव्या तंत्राला लागेल असा अद्ययावत नाही तेव्हा मोबाईलवरून वर्ग घेणं शक्य होत नाही. वर्गात शिकवताना तिथल्या तिथे प्रतिसाद मिळतो. विद्यार्थ्यांच्या डोळ्यात बघून कळतं की आपण शिकवतोय ते त्यांना कळतंय की नाही, ती सोय इथे नाही.

- **पालक वर्ग**

लॉकडाऊनमध्ये बेरोजगारीमुळे अनेकांना आपल्या पाल्याची फी भरणं शक्य नाही. काही शाळांनी फी भरली नाही म्हणून सरळ Leaving Certificate पाठवून दिलं घरी. साधारणपणे घरात एकच लॅपटॉप किंवा कॉम्पुटर असतो. जिथे दोन मुलं आहेत तिथे एकाचवेळी दोघांचे वर्ग असतील तर आजच्या ह्या स्थितीत नवीन लॅपटॉप घेणं शक्य नाहीये. काही शाळांनी आपल्या फीमध्ये कॉम्पुटर लॅब फीसुद्धा आकारली. आता पालकांचं म्हणणं असं की मुलं घरी शिकताहेत मग ही फी का? त्यांचं बरोबर आहे पण शाळांना ह्या लॅबच्या नियमित देखभालीचा खर्च आहे. काही शाळा केजीच्या विद्यार्थ्यांना व्हिडिओ पाठवतात, तर पालकांचं म्हणणं असं की व्हिडिओ आम्ही दाखवायचा तर फी तुम्हाला का द्यायची? पण शाळेला स्वतःचे खर्च आहेत हे त्यांनी लक्षात घेतलं पाहिजे.

- **विद्यार्थी**

आता ह्या सगळ्या शिक्षणाचा गाभा असलेल्या विद्यार्थ्यांबद्दल बोलूया. शिक्षणव्यवस्था ही विद्यार्थी केंद्रीतच हवी. नेहमीच्या पारंपरिक शिक्षणपद्धतीपेक्षा हे वेगळं आहे त्यात विद्यार्थीसुद्धा प्रयोग करू शकतात, आपल्या शिक्षकांशी ऑनलाईन संपर्क साधू शकतात. पण सगळ्यात मोठा मुद्दा आहे तो इंटरनेट डेटाच्या वापराचा. मध्यमवर्गीय घरात कॉलेजच्या मुलांकडे मोबाईल फोन असतील पण शाळेतील विद्यार्थ्यांचं काय? जिथे मोठी आणि छोटी भावंडं आहेत तिथे एकपेक्षा जास्त लॅपटॉप कुठून आणायचे? महाविद्यालयाही अनेक विद्यार्थ्यांकडे स्मार्ट फोन सोडा पण साधा मोबाईलसुद्धा नाही. अंत्योदयाचे स्वप्न पाहणाऱ्या महात्मा गांधीजींच्या जयंतीचे हे १५० वे वर्ष आहे. मग शेवटच्या माणसाचा विकास जिथे अभिप्रेत आहे तिथे अशा विद्यार्थ्यांना आपण ऑनलाईन शिक्षणापासून वंचित ठेवणार आहोत का? ऑनलाइन शिक्षणामुळे मुलांचा वाढणारा स्क्रीनटाईम आणि त्याच्या अनिष्ट परिणामांचं काय? वाढीव डेटा प्लॅनच्या खर्चाचे काय? बहुसंख्य विद्यार्थ्यांना हा पर्याय आजच्या स्थितीत आवडलाय पण त्यांना इंटरनेट कनेक्टिव्हिटीची समस्या जाणवते, वर्गात लक्ष चांगलं केंद्रित करता येतं, घरी लक्ष पटकन विचलित होतं हेही ओघाने आलं बोलण्यात त्यांच्या.

शेवटी एवढंच म्हणीन की ऑनलाईन शिक्षण ही सध्याच्या परिस्थितीची गरज आहे पण तो कायमस्वरूपी पर्याय कधीच होऊ शकत नाही. ऑनलाईन शिक्षण पद्धती भारतात येणार होतीच पण ती ह्या परिस्थितीत आली. आपल्याला गरज आहे ती ऑनलाईन आणि पारंपरिक शिक्षण पद्धतीचा समन्वय साधण्याची आणि तेही वरील सर्व घटकांना विचारात घेऊन. ■

– डॉ. अमेय तानवडे
९८२०४३२७२०



## संपादकीय

सर्वप्रथम दहावीच्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. वर्षभर केलेल्या मेहेनतीचे सुंदर फळ आज त्यांना मिळाले आहे. मात्र हा त्यांच्या आयुष्यातील पहिला टप्पा असून यापुढे त्यांना यशाची अनेक शिखरे सर करायची आहेत ह्याची जाणीव असुदे. अर्थात त्याचे ओझे आत्तापासून वागवायचे गरज नाही हेही तितकेच खरे आहे. ज्या विद्यार्थ्यांना ह्या परीक्षेत अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नाही त्यांनी फार दु:खी होण्याचे कारण नाही. ही काही आयुष्यातील शेवटची व सर्वात महत्वाची परीक्षा नाही. ह्यावेळी आलेले अपयश भविष्यात उज्ज्वल यश मिळवून आपण नक्कीच धुऊन काढू शकतो असा विश्वास ठेवा. अगदी नापास झालेल्या विद्यार्थ्यांनीसुद्धा पुढे जाऊन आयुष्यात दैदिप्यमान यश मिळवले आहे अशी अनेक उदाहरणे आपल्यापुढे आहेत. मात्र ह्यावेळी आपले काय चुकले, अभ्यास कुठे कमी पडला, मेहेनत, एकाग्रता ह्यात आपण कमी पडलो का ? ह्याचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करणे गरजेचे आहे. पुढल्या परीक्षेत जर आपण असाच अभ्यास केला तर आपल्याला असेच (अप)यश मिळेल ह्याची जाणीव ठेऊन पुढील अभ्यासाची दिशा ठरवावी लागेल. एखाद्या परीक्षेत अपयश मिळणे हा काही गुन्हा नाही पण त्यापासून काहीच न शिकणे हे मात्र साफ चुकीचे आहे. आज विद्यार्थ्यांपुढे अनेक आकर्षणे आहेत. मन अस्थिर करणाऱ्या, अभ्यासातील एकाग्रता कमी करणाऱ्या अनेक गोष्टी आपल्या आजूबाजूला आहेत. ह्यातील अनेक गोष्टी आयुष्यात उपयुक्तसुद्धा आहेत पण ह्यावेळी मात्र त्या सर्व निग्रहाने बाजूला सारून अभ्यासावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

आज कोरोनच्या महामारीमुळे सर्व जगच एक प्रकारच्या अस्थिरतेमध्ये अडकले आहे व त्यातून विद्यार्थीसुद्धा सुटले नाहीयेत. मागील वर्षीपर्यंत शाळेतील मित्रांबरोबर बागडणाऱ्या ह्या विद्यार्थ्यांना ह्या वर्षी मात्र online वर्गात बसावे लागणार आहे. नवीन परिस्थितीशी जुळवून घेणे त्यांच्यासाठीसुद्धा एक प्रकारचे आव्हानच असणार आहे. ह्या संक्रमणात आपल्या पाल्याला समजून घेऊन त्याला मदत करण्याची मोठी जबाबदारी आज पालकांवर आहे. उद्याचे, कोरोना नंतरचे जग कसे असणार आहे ते ही कोवळी पिढीच ठरवणार आहे. ते योग्यच आहे कारण भविष्यामध्ये सर्वात जास्त stakes ह्याच पिढीचे आहेत, जेष्ठांचे नव्हे !

आम्ही पार्लेकर

संपादक
ज्ञानेश चांदेकर

निर्मिती प्रमुख
अनिता चांदेकर

सहाय्यक संपादिका
भाग्यश्री महाजन
editorial@parlekar.com

रेखाटने
अथर्व वणकुद्रे

व्यंगचित्रे
श्रीनिवास प्रभुदेसाई

सजावट व मांडणी
शशांक शिवगण

वितरण
जस्वीन पांजरी , प्रथमेश गुरव

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com

कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई - मेल : info@parlekar.com वेबसाईट: www.parlekar.com

# एक बहुआयामी लेखक

## - गुरुनाथ तेंडुलकर



**साहित्य कट्टा**

आग्रीपाडा ते विलेपार्ले असा जिद्दीचा प्रवास करून आलेले गुरुनाथ तेंडुलकर यांचा जीवनप्रवास त्यांच्या लेखनातून सहजच जाणवतो. ते पार्लेकर असल्याने साहित्य कट्टा सदरात त्यांना आमंत्रित करणे साहजिकच होते.

त्यांच्या लेखनाची ओळख मला दिवाळी अंकांतील कथांतून झाली. त्यानंतर पार्ल्यातल्याच एका सांस्कृतिक कार्यक्रमात भेटही झाली. त्यानंतर मग मला त्यांची एखादी कथा आवडली तर किंवा माझा एखादा अनुवाद त्यांना आवडला तर अशी आमची फोनाफोनी होत असे. परंतु तेव्हा ते एच.डी. एफ.सी. वित्तसंस्थेत डेप्युटी जनरल मॅनेजर पदावर होते. गेल्याच वर्षी सेवानिवृत्त झाले. त्यामुळे आता प्रत्यक्ष भेटून त्यांचा लेखनप्रवास जाणून घेण्याची इच्छा होती परंतु कोरोनाकृपेने फोनवरच निभावावे लागत आहे.

एका बाजूला गिरणगावची श्रमिक वस्ती तर दुसऱ्या बाजूला कामाठीपुरा अशा आग्रीपाड्यातील गरीब कुटुंबात त्यांचं बालपण गेलं. वडील मुंबई महानगरपालिकेत नोकरीला होते परंतु गुरुनाथला शिक्षणात कमी पडू नये यासाठी ते एका डॉक्टरांकडे अर्धवेळ कंपाऊंडरचंही काम करायचे. स्वतः गुरुनाथ, एक मोठी बहीण आणि आईवडील या चौकोनी कुटुंबात मुलांच्या शिक्षणाचं खूप महत्व होतं. आईवडिलांचा हात पाठीवर असल्यानेच मी शिक्षणात एवढी मजल मारू शकलो असं ते कृतज्ञतेने नमूद करतात. पुढे ते एमएससी झाले, मानसशास्त्रात रस असल्याने त्यातही मास्टर्स केलं आणि एमफिलही केलं. नरसी मोनजी कॉलेजातून एम.बी. ए. फायनान्सचीही पदवी घेतली.

लहान वयातच संगीतकार आणि कवी यशवंत देव यांच्याशी गाठ पडल्याने ओशो विचार आणि जीवनातील अनेक पैलूंशी ओळख झाली.

गिरगावातील राममोहन शाळेत असल्यापासूनच त्यांना लेखनाची आवड होती. त्यामुळे पहिली कथा त्यांनी १९७८ साली म्हणजे वयाच्या १९ व्या वर्षीच लिहिली. ती लोकप्रभामध्ये प्रसिद्धही झाली. त्यानंतर १९७८ ते ८० या तीन वर्षांच्या काळात लोकप्रभा, वाङ्मयशोभा, वसंत, प्रपंच, ललना आदी मासिकात त्यांच्या वीस बावीस कथा छापून आल्या. या नादात अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊ लागलं. साहजिकच विद्यार्थीदशेत अभ्यासच करणं महत्वाचं आहे हे आईने मनावर बिंबवल्यामुळे त्यानंतर काही काळ त्यांनी शिक्षणावरच लक्ष केंद्रित केलं.

त्यानंतर नोकरी, आर्थिक घडी बसवणे अशा प्रापंचिक रामरगाड्यात चारचौघांसारखेच तेही गुरफटून गेले असले तरी त्यांच्यातील लेखक अस्वस्थ होता, रोजच्या जीवनात येणारे अनुभव टिपत होता. गुरुनाथ सांगतात, एचडीएफसीत बरीच वर्षे कर्जवसुली विभागात काम केल्याने वेगवेगळ्या स्तरांतील माणसं जवळून पाहायला मिळाली. मानसशास्त्राचाही अभ्यास असल्याने माणसं वाचायला शिकत गेलो.

त्याचाच पुढे लेखनात खूप उपयोग झाला. आजवर त्यांनी बेळगाव तरुण भारत, माहेर, मेनका, किस्त्रिम, वसंत, दीपलक्ष्मी, पुरुषस्पंदन, हेमांगी, साहित्य, युगांतर , चारचौघी अशा दर्जेदार दिवाळी अंकांत जवळजवळ सव्वाशेहून अधिक कथा लिहिल्या आहेत. तरुण भारत, सुवासिनी अशा मासिकात वेगवेगळ्या विषयांवर सदर लेखन केलं आहे. तसंच विद्यार्थ्यांना मूल्यशिक्षण देणारी पुस्तकंही (जीवनदर्शन, शब्द अमृताचे, आनंदयात्रा) लिहिली आहेत. यापैकी जीवनदर्शन आणि शब्द अमृताचे पुस्तकांना राज्यस्तरीय उत्कृष्ट लेखन पुरस्कार मिळाले आहेत.

त्यांच्या अनेक कथा बोल्ड विषयांवर असून त्यात राजकारण, गे आणि लेस्बियन संबंध, पाप–पुण्याच्या बदलत्या संकल्पना, कॉर्पोरेट जगातील स्त्रीदेहाचा बाजार (लेदर करन्सी), विवाहबाह्य संबंध, बुवाबाजी आणि अंधश्रद्धा, उत्सवांतील बदलती मानसिकता असे आधुनिक विषय त्यांनी हाताळले आहेत.

त्यांच्या काही कथांवर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये चर्चासत्रेही आयोजित केली गेली. मराठीतील आधुनिक उत्कृष्ट निवडक कथांच्या गगन या कथासंग्रहातही त्यांच्या पाप या कथेचा समावेश झालेला आहे. तसंच कित्येक शाळांनी संस्कारमूल्ये शिकवणाऱ्या त्यांच्या पुस्तकांचा शालेय विद्यार्थ्यांच्या अवांतर वाचनासाठी म्हणूनही समावेश केलेला आहे.

गुरुनाथ तेंडुलकर यांचा आणखी एक पैलू म्हणजे त्यांनी भारतीय उपास्य देवतांवर गीते, स्त्रोत्रे आणि आरत्याही लिहिलेल्या आहेत. संस्कृतची खूप आवड असल्याने ५००० हून अधिक श्लोक आणि मराठीतील ५०० कविता त्यांना मुखोद्गत आहेत. २०१८ सालचा कोकण मराठी साहित्य परिषदेचा कवी उमाकांत कीर स्मृती काव्य पुरस्कारही त्यांना मिळाला आहे. तसंच महाराष्ट्र शासनाच्या डॉ. विजया वाड संपादित बालकोषासाठीही त्यांनी कथालेखन केलेलं आहे.

सध्या ते पत्नी गीतांजली आणि कन्या गार्गी यांच्यासमवेत सुखाने कलाक्रमणा करत आहेत. सेवानिवृत्तीनंतरच्या सेकंड इनिंगमध्ये त्यांच्या लेखनास अधिकाधिक धुमारे फुटोत अशा शुभेच्छा देऊन मी त्यांचा निरोप घेतला.

■

– सविता दामले
९९३०३११५४६

# आरोग्य - एक चळवळ

**सध्याच्या करोना पार्श्वभूमीवर आरोग्य या संकल्पनेचा अर्थ समजावून घेऊया.**

जागतिक आरोगय संघटनेच्या व्याख्येप्रमाणे 'आरोग्य म्हणजे फक्त रोगांचा अभाव नव्हे तर शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक संतुलन होय. आता ही जबाबदारी कोणाची? अर्थातच व्यक्ती, समाज व सरकार यांची म्हणजेच आपणा सर्वांची!

आता व्यक्ती म्हणून आपल्यापैकी कितीजण योग्य आहार घेऊन वजन नियंत्रणात ठेवतात? पार्ल्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांच्या तपासणीत असे आढळले की स्थूलपणा खूपच प्रमाणात अस्तित्वात आहे. अर्थात तिच परिस्थिती आई बाबांची आहे. नियमित व्यायाम किती मंडळी करतात? ( फिरणे, पोहणे वगैरे) व्यसनांना किती लोक दूर ठेवतात? मनःशांतीसाठी काय सवयी अंगीकारल्या जातात? याऊप्पर आजारपण आल्यास (वयपरत्वे येणारच!) त्याचा उमदेपणाने स्वीकार करून योग्य औषधोपचार नियमितपणे केले जातात? या सर्व प्रश्नांची उत्तरे आपली आपण प्रांजळपणे द्यावीत. आज कोरोनासंदर्भात मुखपट्टी अर्थात मास्कचा वापर, स्वच्छता राखणे, गर्दी टाळणे आपण करतो का?



**आरोग्यमंत्र**

समाज म्हणून आरोग्यदायक सवयी म्हणजे स्वच्छतेचे पालन, खोकतांना किंवा शिंकताना रूमालाचा वापर, रस्त्यावर न थुंकण्याची खबरदारी इ. पार्ल्यातील सुशिक्षित मंडळीं या काळात कटाक्षाने वापरावयाच्या मास्कला गळयात दागिन्याप्रमाणे वा टकलावर मुकुटाप्रमाणे मिरवतांना पाहिले आहे.

सरकारचे आरोग्याकडे झालेले दुर्लक्ष या करोनाच्या साथीमुळे उघड झाले आहे! मग यावर उत्तर काय, तर आरोग्य हा विषय नुसताच चर्चेत न रहाता एक चळवळ होणे आवश्यक आहे. समाजानेदेखील आरोग्य व पर्यावरणाला महत्त्व देणे गरजेचे आहे. सरकारने आरोग्य या विषयाला अग्रक्रम देऊन त्यावरील खर्चात वाढ केली पाहिजे व हा खर्च म्हणजे गुंतवणूक समजली पाहिजे. सार्वजनिक आरोग्यसेवांचा दर्जा सुधारला पाहिजे. असे झाले तरच '' सर्वे सुखिना संतु , सर्वे संतु निरामया।'' हे वचन साध्य होईल!

■


– डॉ. सुहास पिंगळे
९३२२२५०८३०



## चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाच्या श्रीमती हेमा मुकुंद श्रीखंडे यांचे निधन

एक कर्तृत्ववान आणि ज्येष्ठ पार्लेकर आणि लोकप्रिय शिक्षिका श्रीमती हेमा मुकुंद श्रीखंडे यांचे ६ जुलै रोजी वयाच्या ८६ वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांनी लिहिलेले 'उत्तम गुणाची मंडळी' हे पुस्तक म्हणजे त्यांच्या अभ्यासू वृत्तीचे, इंग्रजी–मराठी वाचनाच्या वेडाचे, मराठी भाषेवरच्या प्रभुत्वाचे उत्तम उदाहरण आहे. साहित्याप्रमाणेच इतर कला प्रकारांवर विशेषत: काव्य–संगीतावर त्यांचे निस्सीम प्रेम होते.

अप्रतिम हस्ताक्षर, छान विनोदबुध्दी, सुग्रण या त्यांच्या गुणांमळे व सगळयांना आपलंसं करण्याच्या स्वभावामुळे त्यांचा लोकसंग्रह मोठा होता. जेष्ठ अभिनेते श्रीकांत मोघे आणि सुप्रसिद्ध कवी कै. सुधीर मोघे अशा कलाप्रेमी भावंडाचा त्यांना सहवास लाभला. त्यांच्या मागे दोन मुलगे, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. समस्त पार्लेकरांतर्फे त्यांना विनम्र आदरांजली.



## लक्षवेधी
### - डॉ. शेखर आंबर्डेकर

काही जणांची व्यक्तिमत्त्वंच इतकी प्रसन्न असतात की, त्यांच्या सान्निध्यात येणाऱ्या व्यक्तींवर पण आपोआपच त्या प्रसन्नतेचा शिडकावा होतो. आणि ते जर एक डॉक्टर असतील तर हा परिणाम अनेकपटींनी वृद्धिंगत होतो. अशाच व्यक्तिमत्वाचे धनी असलेले आणि गेली चार दशके आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा रुग्णांना लाभ देणारे, प्रख्यात हृदयरोग तज्ञ, म्हणजेच आपल्या सर्वांना ज्ञात असलेले, डॉ. शेखर आंबर्डेकर.

डॉक्टरांचा जन्म १९५४ सालचा, कोल्हापूरातला. बालपणाचा काही भाग तिथेच गेला. डॉक्टरांचे वडील हे महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळात अभियंता होते, त्यामुळे डॉक्टरांचे शालेय शिक्षण त्यांच्या बदल्यांनुसार फलटण, राधानगरी, मुंबई, सोलापूर अशा अनेक ठिकाणी पार पडले. बुद्धिमत्तेचा वारसा डॉक्टरांना त्यांच्या वडिलांकडूनच मिळाला असे म्हणायला काही हरकत नाही. त्यांच्या वडिलांना, बनारस हिंदू विश्वविद्यालयात, शिष्यवृत्तीवर प्रवेश मिळाला होता आणि त्यांनी त्या काळात, तिथून इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले होते. डॉक्टरांचे प्राथमिक शिक्षण होत असतानाच, त्यांच्या वडिलांची बदली मुंबईला झाली आणि डॉक्टरांचे चवथी ते नववीपर्यंतचे शिक्षण वांद्र्याच्या शाळेत पार पडले आणि पुढच्या बदलीमुळे, शालान्त परीक्षा त्यांनी सोलापूरमधून दिली. महाविद्यालयीन शिक्षण मात्र, मुंबईत रुईया कॉलेजमध्ये झाले आणि उत्तम गुणांनी त्यावेळचे इंटर सायन्स उत्तीर्ण झाल्यावर, त्यांनी ग्रँट वैद्यकीय महाविद्यालयात (जे. जे. हॉस्पिटल) प्रवेश घेतला आणि पुढील सर्व शिक्षण तिथूनच त्यांनी पूर्ण केले.

ह्या कॉलेजशी त्यांचे अतिशय घनिष्ठ संबंध आहेत आणि आपल्या आयुष्यातील जवळ जवळ एक तपाहून अधिक काळ त्यांनी ह्या महाविद्यालयात वेगवेगळ्या नात्यांनी व्यतीत केला आहे. विद्यार्थी म्हणून कॉलेजात दाखल झालेले डॉक्टर, प्रथम १९७६ मध्ये डॉक्टरकीची पदवी, त्यानंतर तिथेच उच्च शिक्षण आणि ते करत असतानाच ICCU Registrar, Cardiology Registrar अशा विविध पदांवर काम करून अखेर ते लेक्चरर म्हणून काही काळ काम करून मगच त्या कॉलेजमधून बाहेर पडले. लेक्चरर व्हायच्या आधी डॉक्टरांनी कार्डिओलॉजिमध्ये १९८४ साली एम. डी. ही पदवी संपादन केली आणि त्याच कॉलेजमध्ये काही काळ शिकवून, त्या वास्तूचे ऋण काही अंशी तरी फेडून ते तिथून १९८७ साली बाहेर पडले. आणि इथूनच मग डॉक्टरांची व्यावसायिक कारकीर्द खऱ्या अर्थाने सुरु झाली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

आज, वैद्यकीय क्षेत्रासंदर्भात अनेक उलट–सुलट गोष्टींची चर्चा होत असते. काही अनैतिक गोष्टींचासुद्धा ह्या क्षेत्रात शिरकाव झालेला आहे. हॉस्पिटल्सच्या बाबतीतसुद्धा काही वेळा आपल्याला, रोग्याला उपचारांच्या नावाखाली लुटण्याच्या प्रकारांबद्दलचे आरोप झालेले ऐकायला मिळतात. ह्या सर्व नकारात्मक वातावरणातसुद्धा डॉक्टरांसारखे काही व्यायसायिक आपल्या व्यवसायाच्या नीतिमूल्यांना घट्ट धरून आपला मार्ग चालताना दिसतात आणि परत आपला ह्या नोबल प्रोफेशनवरील विश्वास टिकून राहतो.

आता, डॉक्टरांना विचाराल तर ते म्हणतात, ' मी माझा व्यवसाय, माझे काम नीट आणि प्रामाणिकपणे करतो, ह्यात कौतुक करण्यासारखे काय आहे? हे माझे कर्तव्यच आहे आणि त्यांत मी काही मोठे काम करत आहे असे मला अजिबात वाटत नाही. किंबहुना, वैद्यकीय आणि समाजातील इतर क्षेत्रांतही, समाजोपयोगी आणि खूप चांगले काम करणारे लोक आहेत आणि ह्या सदरासाठीसुद्धा त्यांचा विचार आधी व्हायला हवा होता.' वैद्यकीय व्यवसायाकडे फक्त अर्थार्जनाचे साधन म्हणून न पाहता आपल्याला मिळालेले ज्ञान आणि अनुभव यांच्या आधारावर फक्त रुग्णाच्या हिताचा सल्ला देणे हेच प्रत्येक डॉक्टरचे कर्तव्य आहे यावर त्यांचा दृढ विश्वास आहे.

डॉक्टर त्यांच्या खासगी व्यवसायाबरोबरच मुंबईतील मान्यवर अश्या दोन वैद्यकीय संस्थांशीसुद्धा गेली अनेक वर्षे मानद कार्डिओलॉजिस्ट ह्या नात्याने निगडित आहेत. एस. एल. रहेजा इस्पितळ, अखिल भारतीय मधुमेह संघटना, इथे १९८८ सालापासून तर एशियन हार्ट इन्स्टिट्यूट येथे २००५ सालापासून ते आजतागायत. ह्याचबरोबर, डॉक्टर एका अतिशय अभिनव प्रकल्पाचे भाग होते. प्रिव्हेंटिव्ह कार्डिओलॉजी अंतर्गत त्यांनी सांताक्रूझ येथील योग इन्स्टिट्यूट ह्यांच्या 'केअरिंग हार्ट प्रोजेक्ट' ह्यात कार्डिओलॉजिस्ट म्हणून सहभाग घेतला होता आणि विशेष म्हणजे, ह्या प्रकल्पाचा त्या वर्षीच्या, म्हणजेच २००४ साली, जर्नल ऑफ असोसिएशन ऑफ फिजिशियन्स ऑफ इंडियामध्ये अंतर्भाव करण्यात आला होता. शिवाय हे सर्व व्याप सांभाळून, ते विविध मेडिकल जर्नल्स मधून शोध निबंध आणि लेख लिहित असतात. आजही ते उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना, वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांना आणि त्याच बरोबर सर्वसामान्य लोकांनासुद्धा आपल्या ज्ञानाचा फायदा त्यांच्या भाषणांद्वारे करून देत असतात. असंख्य मेडिकल कॉन्फरन्सेसमधून त्यांची उपस्थिती असते. रेडिओ आणि टेलिव्हिजनवरील अनेक कार्यक्रमांमधूनसुद्धा ते आपल्या अनेकदा भेटीला येतात. त्यांच्या ह्या विविध कार्यांचा नुसता धावता परामर्श घेतानासुद्धा आपण थक्क होऊन जातो.

'बोले तैसा चाले ' ह्या उक्तीप्रमाणे, डॉक्टर स्वतः आपल्या फिटनेसबद्दल अत्यंत जागरूक आहेत आणि आज वयाच्या पासष्टीनंतरही त्यांच्याबरोबर, ते चालत असताना, आपल्याला धावायला लागते. जलद चालण्याबरोबरच, त्यांना पोहणेही अत्यंत प्रिय आहे आणि आजही ते त्यांच्या ठरलेल्या फेऱ्या एका दमात मारूनच टँकबाहेर येतात.


बुद्धिमत्ता ही सर्वस्पर्शी असते, ह्या सिद्धांताला अनुसरून, डॉक्टरांना साहित्य, संगीत, छायाचित्रण आणि नाट्य ह्या सर्व प्रकारांमध्ये रस आहे आणि गतीही! त्यांनी त्यांच्या कॉलेजजीवनात सातत्याने आंतर–महाविद्यालयीन नाट्य स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे आणि पारितोषकेदेखील मिळवलेली आहेत. सामान्य जनांसाठी हृदयरोगाबद्दल सोप्या भाषेत त्यांनी लेखांची मालिकाच लिहिली होती आणि कालांतराने, मॅजेस्टिक प्रकाशनाने त्याचे 'हृदयगोष्टी' ह्या नावाने पुस्तक २००३ साली प्रकाशित केले आणि आतापर्यंत त्या पुस्तकाच्या तीन आवृत्या संपलेल्या आहेत.

त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येक पेशंटच्या हृदयावरचा आणि मनावरचाही ताण आपल्या नर्मविनोदी संभाषणचातुर्याने हलकेच दूर करणाऱ्या, आणि संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाला एका सकारात्मक ऊर्जेचा अनुभव देणाऱ्या, डॉक्टर शेखर आंबर्डेकर ह्यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी अनेकानेक शुभेच्छा! ■

– दीपक आचार्य
९८३३०२५२२७

## मारुतीचा शोध

बुकमार्क




कोव्हिडच्या कठीण आणि अकल्पित काळात वेगवेगळ्या वाहिन्यांनी आपले जुने कार्यक्रम पुन्हा दाखवले. अशाच एका पुनःप्रक्षेपित मालिकेतील नायक त्याच्या लॅपटॉपवर पुस्तक वाचीत असल्याचा उल्लेख आला आणि माझे लक्ष वेधले गेले. मग मी इ–बुक्स केव्हापासून सुरु झाली असा शोध घेतला असता १७ फेब्रुवारी २००७ ला पहिले पुस्तक 'किंडल'वर प्रकाशित झाले आणि साडे पाच तासात त्याला प्रतिसाद मिळू लागला अशी माहिती मिळाली.

आज तर e-books हा प्रकार अधिकच लोकप्रिय होतो आहे कारण आज ग्रंथालये बंद आहेत.

सध्या ग्रंथ प्रकाशनाचे काम ठप्प झाले आहे त्यामुळे 'किंडल'वर पुस्तक प्रकाशित करणे उत्तमच. इंग्रजीची त्याच दिवशी तर इतर भाषांतील पुस्तके ४८ तासात प्रकाशित होतात. 'किंडल'वर आज एक लाखाहून अधिक पुस्तके उपलब्ध आहेत. याच 'किंडल' प्रकाशनाचा आधार घेत दीपा मंडलिक यांनी आपली तीन नवीन पुस्तके 'मर्क्युरी आयडिया', 'चांद मातला मातला' आणि 'मारुतीचा शोध' ही हल्लीच प्रकाशित केली आहेत. तर याआधी प्रकाशित झालेल्या 'दिवस असे की' या विनोदी कथासंग्रहाची दुसरी आवृत्तीदेखील किंडल वर उपलब्ध केली आहे.

यापैकी 'मारुतीचा शोध' या पुस्तकाचा आपण विचार करणार आहोत. या पुस्तकाची अर्पणपत्रिका अगदी लक्षणीय आहे. पार्ल्यातील 'कथा–क्लब' मध्ये कथालेखनाची जणू पाठशाळा घेत नवोदितांना किंवा आधी कधीच कथालेखन न केलेल्यांना प्रोत्साहित करणाऱ्या, मायेने सल्ला देत त्यांचा आत्मविश्वास उंचावणाऱ्या कै.चारुशीला ओक आणि श्रीमती माधवी कुंटे या दोन जेष्ठ पार्लेकर, उत्तम गुणांचा संचय असलेल्या लेखिकांना हे पुस्तक अर्पण केले आहे. पूर्वी विविध लोकप्रिय अंकात प्रसिद्ध झालेल्या ९ कथा या संग्रहात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

त्यापैकी 'मनाचिये गुंती', 'वावटळ', 'मध्य' आणि 'उसनं सुख' या कथा कुटुंब आणि त्यातील प्रमुख व्यक्ती यांच्या भोवती गुंतलेल्या आहेत. परस्पर संबंध, नात्यांची गुंतागुंत, पूर्वग्रह, भूतकाळ–भविष्यकाळाचा संघर्ष, स्वतःचे अहंकार, घराण्याचे अहंकार, आपल्या आयुष्याचे अग्रक्रम या सर्वांचा विफल–सफल गोफ गुंफत त्या त्या व्यक्तीची मानसिकता, तीत वेगवेगळ्या वेळी होणारे बदल यानुसार अनुभव आणि व्यक्तिरेखा जिवंत झाल्या आहेत.

'निबंध' या कथेत एका शाळकरी मुलाने प्रत्यक्ष अनुभवलेला पाऊस आणि निबंध लेखनातील 'पाऊस' याविषयीचे द्वंद्व चित्रित झाले आहे. 'भ्रम आणि ध्वनी' ही 'भ्रमणध्वनी' म्हणजेच मोबाईलचा अती वापर करणाऱ्या गृहस्थाची 'आपले मरण पाहिले म्या डोळा' अनुभवताना होणाऱ्या भ्रमनिरासाची कथा आपल्याला शकुंतला परांजपे यांच्या 'माझी प्रेतयात्रा'ची आठवण करून देते.

'गुलमोहर'मध्ये अनेक वर्षानंतर गावच्या त्याकाळातील स्त्रियांच्या ओढीने जाणाऱ्या नायकाची 'कृष्णाकाठी कुंडल आता पहिले उरले नाही' अशी अवस्था होते.

संपूर्ण जगात सुखाचा अभाव असताना 'भूतान हा सुखी माणसांचा देश का आणि कसा?' या कुतूहलातून भूतानला गेलेल्या दहा–बारा उच्चभ्रू भारतीय पर्यटकांची कथा आहे 'अपरिग्रह'. 'आमचे सुख हे अपरिग्रह– कशाचाही संग्रह न करण्याच्या शिकवणुकीचे रहस्य' हे त्यांना तिथला उच्चशिक्षित गाईड समजावून,पटवून देतो. ते त्यांना समजतेही पण मूळ स्वभाव जात नाही. शेवटच्या दिवशी भूतानमध्ये करता येऊ शकणाऱ्या गुंतवणुकीचे हॉटेल, गृहनिर्माण प्रकल्प त्या प्रोजेक्टचे मार्केटिंग जाहिरात या त्यांच्या अंगवळणी पडलेल्या विषयात ते गुंतून पडतात आणि त्या वावटळीत 'अपरिग्रहाचा' विचार कुठच्या कुठे उडून जातो. अपरिग्रह आणि अधिकाधिक धन मिळण्याची ओढ यातील विरोधाभास उत्तम रीतीने अधोरेखित करणारी ही कथा आपल्यालाही विचार करायला प्रवृत्त करते.

कथासंग्रहाचं शीर्षक आणि मुखपृष्ठ यासाठी निवडलेली 'मारुतीचा शोध' ही कथा एका वेगळ्या कथाप्रकाराचा नमुना आहे. कोडी सोडवण्याचा छंद असलेला, प्रौढ वयातील नायक पावसात सापडलेल्या पाकिटाच्या मालकाचा– मारुती शिंदे याचा शोध घेतो त्याची ही कथा. रहस्यमय पण प्रसन्न विनोदी शैलीत आपल्या समोर येते आणि आपल्यालाही 'मारुती' म्हणजे 'हनुमान' नाही तर त्या नावाच्या माणसाचा शोध सुफळ संपूर्ण झाल्यावर प्रसन्न करते.

सशक्त कथाबीजे असलेल्या नर्मविनोदी, प्रसन्न, सहजसुंदर शैलीत लिहिलेल्या या कथा वाचकांना आनंद देतात, विचारप्रवृत्त करतात आणि लेखिकेने डिजिटल स्वरूपात प्रकाशित केलेली इतर पुस्तके वाचण्याची उत्सुकता निर्माण करतात.

शेवटी पुस्तक हे पुस्तक रूपात असो की डिजिटल रूपात, वाचन संस्कृती टिकली पाहिजे हे खरं ! कारण 'वाचाल तर वाचाल' हे आपल्याला पटले आहेच.

– अलका गोडबोले
९९६७६६६६७० ■

# मराठी मनोरंजन विश्व




## गाणे ताऱ्यांचे , गाणे साऱ्यांचे

ऑगस्ट महिन्यात अनेक वाहिन्या नवीन कार्यक्रम घेऊन आपल्यासमोर येत आहेत. सोनी मराठी वाहिनीने आपल्यासाठी 'सिंगिंग स्टार – गाणे ताऱ्यांचे ,गाणे साऱ्यांचे ' हा कार्यक्रम आणला आहे. प्रत्येकाच्या मनात एक गाणे असते आणि हे गाणे ओठांवर आणण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून होणार आहे. या कार्यक्रमात गाणारे तारे हे व्यवसायाने गायक नाहीत, पण त्यांना गाण्याची आवड आहे. या कार्यक्रमातून त्यांची कला आपल्याला पाहता येईल अभिनेत्री ऋता दुर्गुळे ही या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणार आहे. तर या कार्यक्रमाचे परीक्षक म्हणून सुप्रसिद्ध गायक, अभिनेते प्रशांत दामले, राष्ट्रीय पुरस्कार विजेती गायिका बेला शेंडे आणि सुप्रसिद्ध संगीतकार सलील कुलकर्णी करणार आहेत. सर्व ताऱ्यांना गाणे शिकवण्यासाठी आणि त्याचे मार्गदर्शन करण्याकरिता संगीत क्षेत्रातील कुशल मार्गदर्शकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार तारे आणि गायक अशा जोड्या करण्यात आल्या आहेत. २१ ऑगस्ट पासून हा कार्यक्रम सोनी मराठी वाहिनीवर रात्री नऊ वाजता सुरु होणार आहे. सोनी मराठी वाहिनीचा हा पहिलाच सिंगिंग शो आहे.

## इडियट बॉक्स




सध्या वेब सिरीजचा ट्रेंड लोकप्रिय होतोय. त्यातही मराठी वेब मालिका पण येत आहेत. नुकतीच एम एक्स एक्सक्लुजिव्ह ची नवीन मराठी वेब सिरीज 'इडियट बॉक्स' प्रदर्शित झाली आहे. शिवराज वायचळ आणि शिवानी रांगोळे यांच्या यात प्रमुख भूमिका आहेत.

आकाश हा हेरगिरी करून, प्रेयसी पर्यंत पोहोचण्यासाठी आणि शेवटी प्रेयसीच्या होणाऱ्या नवऱ्याशी भांडण करत आपल्या आयुष्यातील प्रेम परत मिळवण्यासाठी काय काय करतो हे या वेब मालिकेत दाखवले आहे. आकाशवर सायलीचे प्रेम आहे, पण आकाशला मात्र शाश्वती आवडते आहे, असे या मालिकेचे थोडक्यात कथानक म्हणता येईल. आकाशला त्याचे प्रेम शोधता येते का, जवळ असलेल्या गोष्टी सोडून दूरच्या स्वप्नांचा शोध घेणाऱ्या आकाशच्या आयुष्यात नेमके काय होते हे तुम्हाला 'इडियट बॉक्स' ही वेब मालिका बघून कळेल, या मालिकेचे पाच भाग असून एमएक्स प्लेअरवर तुम्हाला हे भाग विनामूल्य पाहता येतील. या मराठी वेब मालिकेत शिवराज आणि शिवानी यांच्यासह स्पृहा जोशी, अभिजित खांडकेकर, संस्कृती बालगुडे, पुष्कर जोग, अक्षय टांकसाळे, सुनील बर्वे, प्रवीण तरडे, मृणाल कुलकर्णी असे अनेक नामवंत कलाकार आहेत. या मालिकेचे दिग्दर्शन जीत अशोक आणि विराजस कुलकर्णी यांनी केले आहे.




## देवा श्रीगणेशा




गेल्या काही वर्षात पौराणिक मालिकासुद्धा खूप लोकप्रिय होत आहेत. स्टार प्रवाह वाहिनीने गणेशोत्सवाचे औचित्य साधून प्रेक्षकांसाठी 'देवा श्री गणेशा' ही भव्य दिव्य मालिका आणली आहे. गणपती हे सर्वांचे लाडके दैवत आहे. बाप्पाच्या अनेक कथा आपण ऐकल्या आहेत. पण या गोष्टींमागेसुद्धा अनेक रहस्यमयी कथा आहेत. बाप्पाच्या जन्मापासून ते बाप्पाच्या विवाहापर्यंतच्या अनोख्या कथा या मालिकेतून दाखवल्या जातील. गणेश चतुर्थीला चंद्राचे दर्शन घेतले तर चोरीचा आळ येतो, अशी समजूत आहे पण मग चंद्राला शाप दिलेल्या बाप्पाच्या भाळी चंद्र कसा? अशा काही कथांचा उलगडासुद्धा या गणेशोत्सवाच्या दिवसात 'देवा श्री गणेशा' या मालिकेतून होणार आहे.

स्टार प्रवाहचे कार्यक्रम प्रमुख सतीश राजवाडे म्हणाले, 'देवा श्री गणेशा' या मालिकेतून संस्कार घडवणाऱ्या छान गोष्टी भव्य स्वरूपात आपल्याला पहाता येतील.' २२ ऑगस्टपासून ही मालिका स्टार प्रवाह वर रात्री साडे आठ वाजता सुरु होणार आहे. ही अकरा भागांची विशेष मालिका असून निर्मिते सिद्धार्थ तिवारी यांच्या स्वस्तिक प्रॉडक्शनने ही भव्य मालिका साकारण्याचे आव्हान पेलले आहे. उंबरगाव येथे मालिकेचे शूटिंग होणार आहे. ■

**– गणेश आचवल**
**९८३३२६८३९१**

# लाईन शिवाय 'ऑनलाईन' खरेदीचा सुरक्षित मार्ग

एखाद्या गोष्टीचा आपण विचार करायचा नाही हे मनावर ठाम बिंबवले तर मन बरोबर फक्त त्याच गोष्टीचा विचार करते हे अनेक मानसशास्त्रीय सिद्धान्तांनी सांगितले आहे. या कोरोनाचेही असेच झाले आहे. कोरोनाचा कितीही विचार करायचा नाही ठरवले तरी जितके दुर्लक्ष करू तितकाच जास्त विचार आपण नकळत करत आहोत. मार्चपासूनचा कालखंड बघितला तर प्रथम अलिप्तता, कुतूहल, भिती, भयगंड, काळजी, अति काळजी या कोरोनाच्या अवस्था पार करून आपण आता नवयुगात नवीन सुरक्षेच्या आयुधांसह जगायला लागलो आहोत. पार्ल्याच्या रस्त्यांवरून फिरताना आता हळूहळू चहाचे नाके परत फुलायला लागले आहेत, आता दुकाने पूर्णवेळ उघडली आहेत आणि रस्त्यावर सकाळ संध्याकाळ मर्यादित का होईना पण गर्दी दिसायला लागली आहे.

एहे काळी ही नकोशी वाटणारी गर्दी आता हवीहवीशी वाटायला लागली आहे. चार महिने पक्षांचा किलबिलाट ऐकल्यावर थोडाफार वाहनांच्या हॉर्नचा कलकलाटही आता सुखद वाटायला लागला आहे कारण तो आपल्या कोरोनाच्या आधीच्या आयुष्याचा भाग होता. ''न्यू नॉर्मल'' म्हणजे नवीन सर्वसाधारण जगात जगताना जुन्या आठवणी या कायमच येत राहणार आहेत.

आता दुकाने उघडली असली तरी लोकांची वर्दळ अजून दुकानात दिसत नाही. रक्षाबंधनासारख्या सणाच्या आदल्या दिवशी बाजारात फिरताना बहिणींसाठी खरेदी केल्या जाणाऱ्या वस्तूंच्या म्हणजे ड्रेस मटेरियल, साड्या आणि दागिने यांची दुकाने उघडी असली तरी शुकशुकाट होता. दरवर्षी रक्षाबंधनाच्या आसपास ही दुकाने गर्दीने फुललेली असतात. ही रिकामी असण्याची मुख्य कारणे म्हणजे अजून लोकांचा खर्च करायला हात धजावत नाही हे एक, दुसरे म्हणजे अजूनही परक्या ठिकाणी जाऊन वस्तूंना हात लावायची भीती आणि तिसरे मुख्य म्हणजे जर बऱ्याच गोष्टी ऑनलाईन किंवा घरपोच मिळणार असतील तर प्रत्यक्ष दुकानात जाऊन खरेदी करायचा धोका का पत्करायचा ही विचारसरणी!

यातले हे तिसरे म्हणजे ऑनलाईन खरेदीचे कारण बऱ्याच दृष्टीने फायद्याचे आहे. भारतीय किरकोळ उद्योगाचे क्षेत्र हे पारंपरिक दुकाने आणि ऑनलाईन बाजार यात विभागले गेले आहे. यात पारंपरिक




दुकानांचा मोठा वाटा आहे पण या कठीण प्रसंगात जीवनावश्यक वस्तू असो वा आता सुरु झालेल्या बाकीच्या खरेद्या असोत, या ऑनलाईन शॉपिंगने बऱ्याच जणांना मोलाचा आधार दिला आहे. ऑनलाईन किंवा ई–कॉमर्सची उलाढाल या अडचणीच्या काळात प्रचंड झाली. सुरवातीला केवळ जीवनावश्यक वस्तूंसाठी परवानगी असलेल्या या ऑनलाईन उद्योगाने जून संपेपर्यंत आपल्या कोरोनापूर्वीच्या उलाढालीच्या तब्बल ९० टक्क्यांपर्यंत मजल मारली. ही ऑनलाईन खरेदी करायला आता अत्याधुनिक तंत्रज्ञान पुन्हा नवनवीन कल्पना घेऊन आपल्या मदतीला धावून आले आहे.

अन्नधान्य, इलेक्ट्रॉनिक्स, पुस्तके इत्यादी गोष्टी ऑनलाईन खरेदी करण्यात काहीच अडचण नाही पण काही गोष्टी या स्वतःला कशा शोभतात हे पडताळून बघितल्याशिवाय खरेदी करणे कठीण असू शकते. सर्व ऑनलाईन शॉपिंग माल पसंत नसेल तर परत करायची सवलत देते पण त्यालाही मर्यादा असतात. अशावेळी तंत्रज्ञान धावून आले आणि व्हर्च्युअल म्हणजेच आभासी ''ट्रायल रुम'' सारख्या गोष्टी अस्तित्वात आल्या. आज तुम्हाला जर का चष्मा किंवा गॉगल घ्यायचा असेल तर दुकानात जायची गरज नाही. टायटन सारख्या चष्मा उद्योगातल्या कंपन्या आपल्याला ही सोय देतात. कंपनीच्या वेबसाईटवर किंवा ॲप्लिकेशन वर आपल्याला हवे ते मॉडेल निवडायचे, आपला नंबर निवडायचा आणि आपल्या संगणकाचा किंवा फोनचा कॅमेरा वापरायची परवानगी दिली की समोरच्या स्क्रीनवर आपल्याला तो चष्मा किंवा गॉगल कसा दिसेल हे जणू काही दुकानात असल्यासारखे दिसते.

फॅशन उद्योगात आज कृत्रिम संज्ञा किंवा आर्टिफिशियल इंटेलिजन्स वापरून बऱ्याच गोष्टी करता येतात. एखादा कपडा आपल्याला कसा दिसतो हे तर ट्रायल रुमसारखे आपल्याला घरच्या घरी संगणक किंवा फोनवर तपासता येतेच पण त्याचबरोबर तुम्हाला कुठेतरी बघितलेला एखादा कपडा आवडला असेल तर त्याचे चित्र वापरून आपण आज ऑनलाईन शॉपिंगमध्ये व्हिज्युअल सर्च करून त्यासारखा कपडा आपल्याला कुठे मिळेल, तो मूळ चित्राशी किती मिळताजुळता आहे वगैरे शोध घेणे सहज शक्य आहे. थोडक्यात पूर्वी दुकानात जाऊन कॅटलॉग बघायचो तर आता आपला कॅटलॉग आपण करून त्यानुसार कपडे ऑनलाईन बाजारात शोधू शकतो.

मार्च एप्रिलमध्ये ठप्प झालेल्या अनेक गोष्टी नवनवीन कल्पनेने पुन्हा सुरु झाल्या आहेत आणि ऑनलाईन खरेदी पुन्हा नव्याने कात टाकून आपल्या नव्या स्वरूपात सज्ज झाली आहे. वस्तू



निवडीपासून ते वस्तू डिलिव्हरी करणाऱ्या माणसाच्या तब्येतीच्या माहितीपर्यंत सर्व माहिती ग्राहकाला देऊन ग्राहकांना पुन्हा नव्या जोमाने आकर्षिले जात आहे. हे खरेदीविक्रीचे चक्र चालू होणे नितांत गरजेचे आहे आणि एकेकाळी थोडीफार टीका सहन केलेल्या ऑनलाईन उद्योगाने अर्थव्यवस्था सुधारण्यात आपला वाटा नक्कीच उचलला आहे. कुठचीही लाईन न लावता करता येणारी ऑनलाईन खरेदी हाच सध्या खरेदीचा पसंतीचा मार्ग झाला आहे. ■

**– निमिष वा. पाटगांवकर**
**९८७०४६९९९३**

Registered-RNI no. 54781/92
Postal Reg. No. MCN/176/2018-2020
Posed at VileParle(E) PO Mumbai-57 on 1st of every month

License to post without prepayment
WPP License no. : MR/Tech/WPP-167/North/2018-20

Date of publishing : 01.08.2020
Total pages incl. cover : 07



बायोस्कोप

## हेअरकट : (वेळ - ९ मिनिटं)

ब्लॅक कॉमेडी हा प्रकार हाताळायला फार नाजूक आहे. आशय आणि विनोदनिर्मिती यातला समतोल ढळला तर त्यातली गंमत निघून जाते. पण ती भट्टी जमून आली की त्यातून जी निर्मिती होते त्याचा आविष्कार म्हणजे आनंद तिवारी आणि सुमित व्यास यांचा हेअर कट हा लघुपट. याचा शेवट तर एकदम झकास!



चकचकित, उच्चभ्रू, फाईव्ह स्टार सलोन्स शहरवासियांना नवीन नाहीत. मात्र तसल्या हौशी सर्वसामान्यांच्या खिशाला परवडण्यासारख्या नसल्याने बहुतांशी लोक बाहेरूनच तो सगळा डामडौल पाहात असतात. या जगापासून कायम लांबच असणारा एक अगदी सामान्य माणूस त्या सलोनमध्ये जाऊन केस कापण्याचं ठरवतो. दुसऱ्याच दिवशी त्याचं लग्न असल्याने थोडे जास्तीचे पैसे खर्च करायलाही तो तयार होतो. झगमगाटात वावरणाऱ्या सेलिब्रिटींनी गजबजलेल्या त्या सलोनमधला त्याचा अनुभव, तिथल्या वातावरणात जाणवणारा संकोच, नवीन हेअरकटमुळे बदललेला लूक, त्याची प्रतिक्रिया हे सगळं पाहायलाच पाहिजे. इम्रान रशीद याने यातली प्रमुख भूमिका कमालीच्या सच्चेपणाने रंगवली आहे.

प्रत्यक्ष संवादातून काहीही न सांगणारा हा लघुपट समाजातील विषमतेवर अचूक बोट ठेवतो.

## व्हाईट शर्ट : (वेळ - १८ मिनिटं)

विवाहबाह्य संबंध हा अनेक लेखकांना, निर्मात्यांना आणि प्रेक्षकांनाही नेहमी आकर्षित करणारा विषय. अनेक उत्तम कथा, चित्रपट, नाटकं, लघुपट याची साक्ष देतील. पण अशा प्रकारच्या कथानकांमध्ये त्यातील प्रमुख तीन पात्रांना सारख्याच संवेदनशीलतेने न्याय देणारी उदाहरणं विरळाच! व्हाईट शर्ट हा लघुपटही याला अपवाद नाही. अविक आणि वाणी या दोघांभोवतीच कथानक फिरतं. त्यांच्यात दुरावा निर्माण करणाऱ्या तिसऱ्या पात्राचा केवळ सूचक उल्लेख येतो.



आपापल्या नोकरी-व्यवसायात मग्न असलेलं सधन, सुशिक्षित असं दोघांचं कुटुंब आणि त्यांच्या संबंधात येणारे ताणतणाव ही परिस्थिती शहरांमध्ये आपल्या आजुबाजूला सर्रास आढळणारी. पण इथे त्याची हाताळणी करताना कुठेही आक्रस्ताळेपणा, आक्रमकता किंवा चमकदार संवाद येणार नाहीत याची दक्षता घेतलेली दिसते. त्यामुळेच नेहमीचे कथानक असले तरी हा लघुपट नक्कीच प्रेक्षणीय झाला आहे. ज्या नात्यात विश्वासाला तडा जातो, तिथे दोघांपैकी एकजणतरी तो सांधण्याचा नेटाने प्रयत्न करणारा असतोच. पण जे हातातून निसटून गेलंय ते चिमटीत पकडून ठेवण्याचा अट्टाहास धरणं म्हणजे आत्मसन्मान गमावण्यासारखं असतं. हे सत्य इथे फ़ार तरलपणे समोर येतं. विशेषत: पतीपत्नीच्या बदलत जाणाऱ्या नात्याचं प्रतिक म्हणून येणारं व्हाईट शर्टचं रुपक अतिशय परिणामकारक आहे.

व्हाईट शर्टचे लेखक आणि दिग्दर्शक आहेत सुमित अरोरा. क्रितिका कामरा आणि कुणाल कपूर या देखण्या जोडीने प्रमुख पात्रांच्या भूमिका उत्तम साकारल्या आहेत.

## आऊच! : (वेळ -१४ मिनिटे)

व्हाईट शर्टप्रमाणे आऊच याही लघुपटाचा विषय विवाहबाह्य संबंधांभोवतीच फिरतो. पण हा गंभीर विषय विनोदी बाज देत लेखक-दिग्दर्शक निरज पांडे याने इतक्या फर्मास पद्धतीने हाताळलाय की बास! आऊच मध्ये खरी बाजी मारली आहे ती मनोज वाजपेयीने! त्याची एक्स्प्रेशन्स, रिअक्शन्स, संवादफेक आणि जबरदस्त टायमिंग सेन्स यामुळे अशा संबंधांमधला अधांतरीपणा आणि धोका या दोन्ही गोष्टी प्रेक्षकांपर्यंत थेट पोहोचतात. प्रेयसी, पत्नी आणि आई या तीन बायकांच्या तावडीत फसलेल्या माणसाची अवस्था त्याने आपल्या अविर्भावातून नेमकी दाखवली आहे. पूजा चोप्रानेही आपली भूमिका साळसूदपणाचे भाव चेहऱ्यावर ठेवून मस्त निभावली आहे. मध्ये मध्ये वाजणारी मम्मीजी कॉलिंगची रिंगटोन आणि लाल सुटकेस यांचा वापर खासच आहे.

## विश्वनाथ एक शिंपी : (वेळ - २३ मिनिटे)

वि वा शिरवाडकर हे जुन्या पिढीतले लेखक असले तरी द्रष्टे विचारवंत होते आणि त्यांच्या अखेरच्या काळात, नव्वदीच्या दशकात आलेल्या जागतिकीकरणाच्या रेट्याचे, त्यातून येणाऱ्या प्रचंड उलथापालथीचेही साक्षीदार होते. खेड्यापाड्यातल्या लहानमोठ्या व्यावसायिकांच्या आयुष्यातही नवीन




आव्हानं घेऊन येणाऱ्या या बदलांविषयी त्यांनी विश्वनाथ एक शिंपी ही लघुकथा लिहिली. याच कथेवर, रविंद्र धोत्रे निर्मित आणि कांचन नायक दिग्दर्शित हा लघुपट यु ट्युबवर उपलब्ध आहे.

गावात जेव्हा शिंप्याचं आधुनिक दुकान सुरू होतं तेव्हा आपला तीन पिढ्यांचा शिंप्याचा व्यवसाय चालवणारा विश्वनाथ न डगमगता त्याविरोधात कसा संघर्ष करतो त्याची ही कथा. मानवी स्वभावाचे सूक्ष्म कंगोरे, विशेषत: बदलाला नाकारणारी त्याची स्वाभाविक वृत्ती यात सहजपणे उलगडत जातात. नातवाची जबाबदारी अंगावर पडलेला, जुन्या शिवणयंत्रापाशीच मनातलं सुखदु:ख मोकळं करणारा, 'कुडीत जीव असेपर्यंत मी लढणार' म्हणणारा म्हातारा विश्वनाथ, निळू फुले यांनी ज्या ताकदीने आणि समरसतेने उभा केलाय त्याला खरंच तोड नाही. त्यांच्याही कारकिर्दीच्या अखेरच्या काळातला हा लघुपट आहे. असामान्य कलावंताची सृजनशीलता शेवटपर्यंत कशी टवटवीत असते त्याचं उत्तम उदाहरण म्हणजे शिरवाडकर आणि निळू फुले या दोन दिग्गजांचा परिसस्पर्श लाभलेला हा लघुपट.

(वरील सर्व लघुपट यु ट्युबवर उपलब्ध आहेत)

- चित्रा वाघ
९८२१११६९३६

■

# चित्रकला एक विस्मरण



दिलखुलास

मी शाळेत होतो त्यावेळी दहावीमध्येच मी एलिमेंटरी, व इंटरमिडिएट या चित्रकलेच्या परीक्षा उत्तीर्ण झालो होतो. तेव्हा अकरावीचं वर्ष शालेय शिक्षणाचं अंतिम वर्ष असायचं, त्यामुळे चित्रकलेसारखे ' अभ्यासेतर उद्योग ' अगोदरच उरकले जायचे. मला आठवतं त्यावेळीही संपूर्ण महाराष्ट्रातून एकदोन लाख मुले या परीक्षांना बसायची.

मी ही गोष्ट सांगतोय, ती सुमारे पन्नास वर्षांपूर्वीची. नंतर या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या खूप वाढली, तरीदेखील दरवर्षी फक्त दोन लाख मुले या दोन परीक्षा उत्तीर्ण झाली, असे गृहित धरले, तरी पन्नास वर्षांत एक कोटी मुलांना चित्रकलेचे प्राथमिक ज्ञान सोळाव्या वर्षीच झाले, असे समजूया.

इतक्या मोठ्या संख्येने समाजातील एक कोटी मुलांना जर का चित्रकलेचे शिक्षण मिळाले, मग या मुलांचे पुढे काय झाले ? यातील किती जणांनी चित्रकलेचा सराव केला? किती जण चित्रसाक्षर झाले? कितीजण चित्रकलेच्या प्रदर्शनांना नियमित जाऊ लागले? यातील अगदी थोडी मुले आर्टस स्कूलमध्ये जाऊन चित्रकलेचे पुढील शिक्षण घेऊन कमर्शिअल आर्टिस्ट झाले किंवा फाईन आर्टिस्ट झाले, परंतु ही संख्या या अभ्यासक्रमांना दिलेल्या सीट्स पाहता दोन-तीन लाखाच्या पलीकडे नाही.

मग या परिस्थितीत काही प्रश्न उभे राहतात तसे इतक्या जणांना चित्रकलेचे शास्त्रशुद्ध शिक्षण मिळूनही आपल्या समाजामध्ये चित्र साक्षरता इतकी कमी का? सर्वसामान्य माणूस चित्रकलेपासून आनंद का घेऊ शकत नाही? आपल्याला महाराष्ट्रातील दहा चित्रकारांची नावे ही सांगता येत नाहीत. या प्रश्नाला सर्वसामान्यपणे राजा रविवर्मापासून लोकं सांगायला सुरुवात करतात आणि एम. एफ. हुसेनपाशी थांबतात! फार तर पुढे दलाल व मुळगावकर!

सय्यद हैदर रझा, अकबर पदमसी,शंकर पळशीकर,मोहन सामंत, के. एच्. आरा, एच्. ए. गाडे, व्ही. एस्. गायतोंडे, बाबुराव सडवेलकर,लक्ष्मण पै, ए. ए. रायबा, अब्दुल रहीम आलमेलकर, प्रभाकर बरवे, रावसाहेब धुरंदर, आबालाल रहिमान, सावळाराम हळदणकर, पेस्तनजी बोमनजी, गोपाळ देऊसकर, एम. आर. आचरेकर, माधव सातवळेकर, रवींद्र मेस्त्री, रघुवीर चिमुलकर, र. धों. धोपेश्वरकर, नगरकर, जगन्नाथ अहिवासी, ज.द. गोंधळेकर, शिल्पकार गणपतराव म्हात्रे, वि. पां. करमरकर ही नावे फार कमी जणांना माहीत असतात. प्रभाकर बरवे (बर्वे नव्हे.) यांचे 'कोरा कॅनवास', माधव आचवल यांचे 'किमया', द. ग. गोडसे यांचे 'पोत' असे कलेविषयक मूलभूत लिखाण अनेक वाचकांनी वाचलेले नसते.

जहांगीर आर्ट गॅलरीचे नाव लोकांनी ऐकले असते, पण फार थोडे लोक तिकडे नियमीत जाऊन चित्रप्रदर्शनं पाहतात. नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट फारच कमी लोकांना माहीत असते. पाब्लो पिकासो, अे. अे. आलमेलकर, रावसाहेब धुरंदर, प्रभाकर बरवे, सुधीर पटवर्धन अशा नामाकिंत चित्रकारांनी आयुष्यभरात काढलेली निवडक चित्रे तिथे, चार मजल्यांवर मांडली होती, व ही प्रदर्शने दीडदोन महिने सुरू होती!

पूर्वी मासिकं, व कॅलेंडर घरोघरी यायची. कालौघात मासिकं बंद पडली, व कॅलेंडरवरची चित्रं नाहिशी झाली. कॅलेंडरवर दिसतात ते बटबटित चौकोन पण उपयुक्त! मागच्या बाजूस उपवासाचे पदार्थ ते रेल्वेचे वेळापत्रक. रंगीत चित्र जाऊ दे, साधे रेखाचित्रं औषधालाही नाही. सामान्य मध्यमवर्गीयांच्या घरात येणारा हा चित्रसंस्कार असा बंद पडला. नाही म्हणायला, विझत चाललेली पुस्तक संस्कृती मुखपृष्ठाद्वारे हा संस्कार आपल्या परिने जतन करत आहे.

गेल्या तीस चाळीस वर्षांमध्ये आपल्याला शाळेत असे शिकवले गेले आहे, की भावी आयुष्यात तुम्हाला मिळणाऱ्या कलेच्या आनंदापेक्षा इतर विषयात मिळालेले गुण हे अधिक महत्त्वाचे आहेत. त्यामुळे गणित, विज्ञान, संस्कृत असे स्कोरिंग विषय घासून घासून त्याच्यात जास्तीत जास्त गुण कसे मिळवता येतील याकडे विद्यार्थ्यांचा कल असतो आणि याला अर्थातच पालकांचाही पाठिंबा असतो.

नुकताच एसएससी चा रिझल्ट लागला. हजारो जणांना नव्वद टक्केच्या वर गुण मिळालेले आहेत. काहींना तर ९६% मिळाले आहेत. याचाच दुसरा अर्थ असा, की शंभरपैकी फक्त चार गुण ते दहा गुण त्यांनी गमावले! अधिक गुण, चांगल्या महाविद्यालयात प्रवेश, तेथून इंजिनीरिंग किंवा डॉक्टर किंवा आर्किटेक्चर साठी प्रवेश, त्यानंतर पदवी घेऊन परदेशी प्रयाण, अशीच संकल्पना आजच्या जगात आहे. या रहाटगाडग्यात कदाचित शालेय जीवनात घेतलेले चित्रकलेचे शिक्षण संपूर्णतः विसरले गेलेले असते किंवा न वापरल्याने पूर्णतः निरुपयोगी झालेले असते. मग कधीतरी निवृत्त झाल्यानंतर या जुन्या छंदाची आठवण येते आणि थोडाफार वेळ मजेत जातो.

पण खरं सांगू त्याला फार उशीर झालेला असतो!....

- राजेंद्र मंत्री
९०२९३१८३२८

■

